सौ. उषा प्रभुणे
सॅनहोजे
कॅलिफोर्निया

"मॅडम, सरांना सांगा ना! आम्ही त्यांचा गौरव ग्रंथ काढतोय्. ते नकोच म्हणताहेत. आमची खूप इच्छा आहे." ह्यांच्या विद्यार्थ्यांनी मला अशी विनंती केली. हे यांच्या रसाळसरांचा गौरवग्रंथ काढायचा विचार करीत होते. पण सर नको म्हणत होते. "मराठवाडा साहित्य परिषद माझ्यावर 'प्रतिष्ठान'चा विशेष अंक काढणार आहे. मग परत वेगळा गौरवग्रंथ कशाला ?" असे सरांचे म्हणणे! असे काही महिने गेले. ह्यांचे विद्यार्थी गौरवग्रंथ काढाण्याविषयी ह्यांना फारच आग्रह करू लागले. मग ह्यांनी सरांना खूप संकोचाने विद्यार्थ्यांचे म्हणणे सांगितले. सरांनी त्यावेळेस "तुम्ही आनंदाने विद्यार्थ्यांना तुमचा गौरव ग्रंथ काढू द्या" असे सांगितले. "विद्यार्थी कौतुक करताहेत तर कौतुक करू द्यात"असेही सांगितले. त्यानंतर ह्यांनी विद्यार्थ्यांना होकार दिला. मग प्रा. डॉ. नानासाहेब सूर्यवंशी आणि प्रा. दीपक चिद्दरवार ह्यांनी खुश होऊन पुढच्या कामाची तयारी सुरू केली. पद्मगंधाचे प्रकाशक श्री अरुण जाखडे यांनी प्रकाशनाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली.

१९७२ साली त्या काळातल्या प्रथेप्रमाणे मला औरंगाबादहून वैजापूर येथे डॉ. चिंतामणराव प्रभुणे यांच्या घरी 'दाखवायला' नेण्यात आले. वैजापूर हे गाव औरंगाबाद जिल्ह्यात आहे. त्या गावी 'दाखवण्याचा' कार्यक्रम झाला; पण ह्यांनी जेव्हा 'पसंती' कळवली तेव्हा मात्र मला आश्चर्यच वाटले ! हे गोरे, तर मी सावळी. हे दिसायला चांगले तर मी साधारण. जोडी कुठेच जमेना. ह्यांना ओळखणा-यानाही आश्चर्य वाटले. लग्न झाल्यावरही मी मनात कुढतच होते. हे म्हणाले "अगं, तुझे निष्पाप डोळे मला आवडले. तुझे खळखळून हसणे मला आवडले. तुमचं सुशिक्षित घर चांगले वाटले. हे सगळे म्हणणे मला एकदाचे पटले आणि मी शांत झाले !

आमच्या लग्नाला यावर्षी सदतीस वर्षे पूर्ण झाली. मागे वळून पहाताना छान वाटते आहे. फार फार समाधान वाटते आहे. पहिले वर्ष एकमेकांचा स्वभाव कळण्यात गेले. मला कळले की ह्या घरांत एकमेकांच्या मनातले ओळखून वागले की हे सगळेजण खुश होतात. आमच्या घरात ह्यांच्या तीन आया आणि वडील होते. तीन आया असूनही घरातले वातावरण निकोप होते. त्यामुळे माझेही या सगळ्यांशी सूर जमायला वेळ लागला नाही. प्रत्येकाची स्वभाववैशिष्ट्ये ह्यांनी मला सांगून ठेवली होती. माझ्या बद्दल, माझ्या स्वभावाबद्दल त्या सगळ्यांना सांगितले होते. हा सगळ्यात महत्त्वाचा रोल ह्यांनी नेहमीसाठीच उत्तमरीत्या सांभाळला. माझ्याकडून काही चूक झाली तर आधी हे आणि नंतर दोन्ही मुलांना समजायला लागल्यावर ते दोघे, असे तिघेही मिळून ज्याचे बरोबर असेल त्याची बाजू घेऊन मला समजून सांगत. क्वचित रागावातही. जेव्हा दुस-याची चूक असेल तर त्यालाही तसेच सांगत. ह्यांचेही चुकले तर मुलांसकट सगळेजणच ह्यांना 'त्यांचे वागणे कसे चुकते आहे' हे सांगत. यामुळे घरातील वातावरण थोड्या वेळाने परत चांगले होई.

आई - वडिलांची ह्यांनी मनापासून सेवा केली. त्यांना फुलासारखे जपले. सासरे ८० वर्षांचे होते तेव्हा त्यांना त्यांचे जन्मगाव, जन्मखोली पाहाण्याची इच्छा झाली. त्या काळात, सास-यांच्या त्या

वयातही ह्यांनी टॅक्सी करून त्यांना त्या गावाला म्हणजे पुणे जिल्ह्यातील जेजुरी जवळच्या मावडी पिंपरीला नेऊन आणले. नोकरी निमित्त आम्ही उदगीरला आणि हे चौघे वैजापूरला. दोन्ही गावात अंतर बरोबर चारशे कि.मि. हे एकुलते एक. त्यामुळे जवळ–जवळ प्रत्येक महिन्याला हे वैजापूरला जाऊन त्यांना भेटत. महिन्याचे वाणसामान भरून देत. त्यांचे हवे नको ते सगळे पाहात. खरे म्हणजे आम्ही त्यांना उदगीरलाच राहायला या म्हणत होतो. पण आपले घर झाल्यावर आम्ही सगळेच तेथे आनंदाने राहायला येऊ असे त्या सगळ्यांचे म्हणणे होते. अशा आणि अशा अनेक पद्धतींनी ह्यांनी त्या सगळ्यांची मनापासून सेवा केली. त्यांनीही आम्हाला सगळ्यांना मनापासून आशीर्वाद दिले.

माझा स्वभाव बराच घायकुतीला येणारा आहे. कुठलेही काम असो ते केव्हा एकदा करून मोकळी होते असे होते. पण त्यामुळे होणारे काम कधी कधी त्रासदायक होऊन माझी, माझ्याबरोबर सगळ्यांचीच चिडचिड होण्यात शेवट होतो. याच्याउलट ह्यांचे काम असते. कोणतेही काम असो, त्या कामाची सुरुवात कशी करायची ? कसे केल्याने ते काम चांगले होईल, अगदी परफेक्ट होईल याचा हे आधीच विचार करणार आणि मगच त्या कामाला सुरुवात करणार. ही चिकाटी, ही मेहनत ह्यांचे कुठलेही काम चांगल्या रीतीने पूर्ण होण्यास उपयोगी पडते.

प्रकाशक श्री जाखडे यांनी मला या ग्रंथात ह्यांच्यावर लेख लिहायला सांगितला तेव्हा ते म्हणाले होते, की "सरांच्या काही खोड्या असतीलच ना ! तेव्हा लेखात त्या खोड्यांवरही लिहा." म्हणून लिहिते.

ह्यांची खोडी म्हणजे राग ह्यांना सहन होत नाही. आमच्या दोघांचा कधी वाद झाला नाही असे नाही. तो तर नेहमीच होतो. अजूनही होतो. पण त्या वादाचे मूळ ९९ टक्के मीच असते. अकारण तोच तोच विषय काढून मीच ह्यांना चिडायला लावते. हे चिडतात. खूप रागावतात. तो राग मग वाईट स्वरूपात बाहेर येतो. त्यामुळे ऐकणा-याचा ह्यांच्याविषयी गैरसमज होतो. या प्रकारे ऐकणा-या लोकांचा गैरसमज होण्यास मीच कारणीभूत होते. माझीच चूक असल्याने मी मात्र गप्प होते. माझा औरंगाबादचा भाऊ शांताराम तर म्हणतो, "अरुणरावांसारखा माणूस नाही. त्यांचे सगळे गूण खूप खूप छान आहेत. अगदी सगळ्यांनी अनुकरण करावे असे. फक्त त्यांचा राग ! तो मात्र फार वाईट आहे." खरोखर मला आता साठीच्या जवळ आल्यावर राहून राहून वाटते, आपलाच स्वभाव आपण बदलायला हवा होता.

ह्यांच्या सहवासाने एक गोष्ट छान झाली. माझ्यात अजिबातच नसलेला आत्मविश्वास थोडाफार तरी निर्माण झाला. १९७३ साली ह्यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या उदगीर शाखेच्या वतीने प्रल्हाद केशव अत्रे यांचे 'साष्टांग नमस्कार' हे नाटक बसवले होते. त्यात एक स्त्रीपात्र कमी पडत होते. आमचा मोठा मुलगा उदय तेव्हा आठ–नऊ महिन्यांचा होता. " उषा, तूच आता नाटकात काम कर. चांगलं करशील." असे ह्यांनी म्हटले. तोपर्यंत मी कधीच नाटकात काम केले नव्हते. " मला जमणार नाही." असे मी म्हटले. तेव्हा मात्र "तू हे काम छान करशीलच"असे हे म्हणाले. नुसते म्हणूनच ते थांबले नाहीत तर नाटकातील ते काम मला करायला लावले. ते चांगले झाल्याची पावती रसिकांनी दिली. मलाही माहिती नसलेला हा गुण त्यांनी असा सिद्ध करून दाखवला. जगाला दाखवून दिला. माझीच मला नवी ओळख करून दिली. माझ्यात नवा आत्मविश्वास जागवला.

मी लग्नाच्या आधीपासून पायमशीनवर कपडे शिवत होते. मला कपडे बेतायला मात्र येत नव्हते. "तू मुलांचे घरचे कपडे शीव. शाळेचा युनिफॉर्म शीव. माझी पॅन्ट शीव. बुश शर्ट शीव. तू शिवलेले कपडे नावं न ठेवता मी आनंदाने घालीन. तू प्रयत्न तर कर." असे ह्यांनी म्हटले. त्यामुळे मी उत्साहाने आमच्या सगळ्यांचे घरात घालायचे आणि बाहेर जाण्याचे कपडे शिवत गेले आणि मी शिवलेले कपडे ह्यांनी शब्द दिल्याप्रमाणे न कुरकुरता आनंदाने वापरलेही. आज अजूनही मीच ह्यांचे सगळे कपडे शिवते आणि तेवढ्याच आवडीने आजही हे मी शिवलेले कपडे वापरतात. अपवाद टी शर्ट्सचा. कारण आजकाल सुनांनी कौतुकाने अमेरिकेतून आणून दिलेले टी शर्ट्स हे आनंदान वापरत असतात.

दोन्ही मुलांचे शाळेत जाण्याचे युनिफॉर्म्स तर शिवत होतेच पण पुण्याला इंजिनियरिंगला ते दोघे असताना मी शिवलेले कपडेच आनंदाने घालीत. अगदी आजही मी शिवलेले कपडे मुलांना वापरायला आवडतात. ह्यांच्या मला प्रोत्साहन देण्याच्या स्वभावामुळे माझ्यातला आत्मविश्वास जागवला गेला म्हणूनच खरोखर हे मी हे सर्व करू शकले.

मुलांचा मी दहावीपर्यंत अभ्यास घेतला. त्याचेही ह्यांना कोण कौतुक ! पूर्वी 'लोकप्रभा'त 'हसत खेळत पी.जे.' म्हणून एक सदर असायचे. या सदरात असतात तशी मी पण द्व्यर्थी गंमत निर्माण करणारी वाक्ये करू शकते हे मला लक्षात आले. असे 'पी.जे.' मी लिहून काढल्यावर हे 'लोकप्रभा'ला पाठवीत. ते 'लोकप्रभा'त प्रसिद्धही होत असे. मी कविता केल्या त्याही ह्यांना चांगल्या वाटल्या. ह्यांनी त्या 'सकाळ' पेपरला पाठवल्या. त्याही 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झाल्या.

दोन हजार नऊ साली अचानकच मला 'लोकसत्ता' पेपरला लेख पाठवावा असे वाटले. तो लेख ह्यांनी माझ्याकडून व्यवस्थित लिहून घेतला. ह्यांनीच तो टाईप केला, त्यात फोटो आवश्यक होते म्हणून ते त्यांनीच तिथे घातले आणि मग तो लेख लॅपटॉपवरून इ-मेलने ॲटॅच करून पाठवून दिला. तोही 'लोकसत्ता' पेपरमध्ये छापला गेला. या बाबतही त्यांनी मला वारंवार सूचना दिल्या, लेख व्यवस्थित वाटेपर्यंत लेखाचे पुनर्लेखन करायला लावले. शुद्धलेखनाच्या सूचना दिल्या. कधी समजावले, कधी चिडले. कधी रागावले. मग मी हिरमुसायची. माझा आत्मविश्वास डळमळायचा. मग काही वेळाने हे शांतपणे नीट समजून द्यायचे. समजूत काढायचे. मग माझा आत्मविश्वास पुन्हा परत यायचा. मला लेखनात हळू हळू ह्यांनी असे 'तयार' केले. म्हणूनच तर हा लेखही मी लिहू शकते आहे.

आमच्या कॉलेजच्या प्राध्यापक चिद्दरवार यांनी तीन वर्षांपूर्वी मला एक दिवस म्हटले, "मॅडम, आमच्या कोमटी समाजाच्या मंडळात एक दिवस तुम्ही व्याख्यान द्या. तुमच्या मुलांना तुम्ही कसे घडवले हे सांगा." आता आली की पंचाईत ! पाच पन्नास बायकांच्या समोर मला बोलायला त्यांनी सांगितले होते. शेवटी ह्यांच्यावर (ह्यांनी नेहमी प्रमाणे आत्मविश्वास दिल्याने) आणि देवावर विश्वास ठेवला आणि व्याख्यान दिले. छान झाले. सर्वांना आवडले.

सांगायचा मुद्दा हा की मी कुणीच नसताना, नुसता मातीचा गोळा असताना ह्यांनी मला मी सध्या आहे अशी घडवले. माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला. पती आणि शिक्षक अशा दोन्ही दृष्टींनी म्हणूनच यांचा मला आलेला आनुभव असा मला नव्याने घडवणारा आहे.

मला जसे घडवले तसेच मुलांनाही यांनी घडवले. मुलांना वाईट वळण लागू नये म्हणून लहान असल्यापासूनच त्यांना काय वाईट आणि काय चांगले हे सांगितले. हे म्हणत तसेच घडत असे. त्यामुळे मुलांनाही ह्यांचे म्हणणे पटत असे. म्हणूनच बाबांजवळ काहीही सांगायला, त्यांच्याशी चर्चा करायला

मुलांना अगदी आजही आवडते. अजूनही आवडते. घरातले कुठलेही काम मग ते लहान असो वा मोठे असो, सर्वांनी मिळून चर्चा करून मगच कसे करायचे ते ठरवले जाते. मुलांची लग्ने झाल्यावर मग सुनांनाही त्यात सहभागी करून घेतले जाऊ लागले. घरात १०० टक्के पारदर्शकता असावी असा आमचा आम्हीच नियम करून घेतला आहे. त्यामुळे गैरसमजांना आमच्या घरात जागाच राहत नाही. सुनाही अशा लबाड आहेत की सास-यांना त्या अगदी खुश ठेवतात. त्यांचे हवे नको ते पाहतात. अर्थात माझ्या कौतुकातही त्या कधीच काही कमी पडू देत नाहीत. काम करू देत नाहीत. त्यामुळे माझे वजन मात्र नेहमी वाढते असते ! शिस्त लागावी म्हणून नातवंडांना हे कधी कधी रागावतात. तरीसुद्धा नातवंडे त्यांनाच चिकटलेली असतात. त्यांच्या सगळ्यां शंकांचे निरसन आजोबा करतात. त्यांच्याशी मस्ती करतात. रंगवून रंगवून गोष्टी सांगतात. मग काय ? सुना, मुले आणि नातवंडेही आजोबांची लाडकी आणि त्यांचे आजोबा लाडके !

मी खूप वर्षांपूर्वी ह्यांना म्हटले होते, "तुम्ही नुसते प्राध्यापक म्हणून राहू नका. नुसते प्राध्यपक म्हणून राहिलेले मला नाही आवडायचे. अजून काही तरी केले तर मला जास्त आवडेल.' नंतर हे म्हटलेले मीच विसरून गेले. पण ह्यांनी ते लक्षात ठेवले. ह्यांनी नंतर पीएच्.डी. केले. रसाळ सर मार्गदर्शक म्हणून लाभणे सोपे नव्हते. त्यासाठी ते म्हणतील तेवढी मेहनत ह्यांनी केली. रसाळ सरांनी सुरुवातीला ह्यांना पुस्तकांवर परीक्षणे लिहायला लावली. समीक्षा लिहायला शिकवली. त्यांच्या मनासारखे हे थोडेबहुत तयार झाल्यावर मग ह्यांना त्यांनी पीएच्.डी.चा विषय निश्चित केला. एकदा विषय ठरल्यावर मग ह्यांनी खूप मेहनत घेतली. रामायण, महाभारत, श्रीमद् भागवत मनापासून वाचले. जुनी नाटके वाचण्यासाठी दोन वेळा मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात गेले. जीर्ण झाल्याने बटर पेपर लावलेली तेथील पुस्तके वाचली. त्यामुळे चष्माही लागला. सकाळी ग्रंथसंग्रहालय सुरू व्हायच्या वेळेला जात. रात्री वेळ संपेपर्यंत वाचत बसत. नोट्स काढत. त्यांच्या इतक्या सलग बसण्यामुळे ते ग्रंथसंग्रहालयातील सगळ्यांच्या लक्षात राहिले. अजूनही तेव्हाचे कुणी भेटले तर ही आठवण काढतात. या सगळ्यांचे चीज झाले आणि यांचा प्रबंध पूर्ण झाला. ह्यांना पीएच्.डी.ची पदवी प्राप्त झाली. हे डॉक्टरेट झाले. या प्रबंधाचे नंतर पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाने 'उत्कृष्ट समीक्षा ग्रंथा'चा १९९७ चा 'श्री.के.क्षीरसागर पुरस्कार' देऊन गौरवले.

दोन्ही मुले अमेरिकेत असल्याने आमचे वारंवार अमेरिकेत जाणे होऊ लागले. मिळालेल्या या संधीचा ह्यांनी चांगला उपयोग करून घेतला. मुलांनी आम्हाला अमेरिकेची अक्षरश: चा-ही धाम यात्रा घडवली. अमेरिकाभरच्या २००० सालच्या आमच्या भ्रमंतीत ओयामिंग राज्यातील 'डेव्हिल्स टॉवर' हे अमेरिकेचे पहिले नैसर्गिक स्मारक एकदा पाहण्यात आले. 'डेव्हिल्स टॉवर'चे उदय व्हिडिओ शूटिंग करीत होता. तेव्हा त्याच्याशी जोडलेली अस्वलाची लोककथा ह्यांनी टूरबुकमधून वाचून दाखवली होती. त्याचवेळेस भारतातल्या लोककथांमध्ये आणि अमेरिकेतल्या नेटिव्ह इंडियन्सच्या लोकथांमध्ये साम्य असल्याचे ह्यांना जाणवले. त्यामुळे त्यांचा अभ्यास करावा वाटला. उदयने मग अमेरिकन इंडियन्सची भरपूर पुस्तके ह्यांना आणून दिली. याच वेळेस कॉम्प्युटर शिकणे गरजेचे वाटू लागले. त्याचाही अभ्यास होऊ लागला. सहा वर्षांनी म्हणजे २००६ साली 'नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या

अस्वललोककथा ’ हे अनुवादित पुस्तक प्रकाशित झाले. ह्यांच्या या दुस-या पुस्तकालाही महाराष्ट्र शासनाने ‘उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा’ २००६ सालचा पुरस्कार देऊन गौरवले.

आता ह्यांनी भारतातल्या आणि अमेरिकेतल्या लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास सुरू केला आहे. अमेरिकेतल्या प्रतिष्ठित विद्यापीठाने या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन ह्यांना ‘व्हिजिटिंग स्कॉलर’ बाबत विचारणा केली आहे.

* * *

१९७२ साली आमचे लग्न झाले. तेव्हा पासून पती म्हणून जशी मी ह्यांच्याकडे बघत आले तशी मराठीचा प्राध्यापक म्हणूनही बघत आले आहे. आमचे लग्न झाले तेव्हा हे औरंगाबादला मौलाना आझाद महाविद्यालयमध्ये मराठीचे अर्धवेळ प्राध्यापक होते. मराठी विषयाला तेथे विद्यार्थी कमी असल्याने ह्यांना शिकवण्याचे समाधान नव्हते. तेथे ह्यांनी जेमतेम दीड वर्षच काम केले. मराठवाडा विद्यापीठात तेव्हा रसाळ सर ‘मर्ढेकर’ शिकवत होते. सरांचे शिकवणे ह्यांना नेहमीच आवडत असे. त्यामुळे कॉलेज संपले की तेथूनच हे परस्पर विद्यापीठात जाऊन त्यांची व्याख्याने ऐकत बसत. वा. ल. कुलकर्णी सर, रसाळ सर यांची दैवतेच आहेत. त्या दोघांचा ह्यांच्यावर खूप प्रभाव आहे. वा.ल. सरांनी ह्यांना उदगीरच्या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून जाण्यास सांगितले. उदगीर या गावाचे नावही आम्ही ऐकले नव्हते. एवढ्या लांब पाठवायला माझे सासरे तयार नव्हते. शेवटी वा.ल. सरांनीच ह्यांच्या वडिलांची समजूत घातली आणि हे उदगीरच्या महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालयात मराठीचे पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून रूजू झाले. सुरुवातीला प्राचार्य ना.य.डोळे यांनी ह्यांना अटी घालण्याऐवजी ह्यांनीच महालक्ष्म्यांच्यावेळी सलग चार पाच दिवस रजा देण्याविषयी आणि एकुलते एक असल्याने लागेल तेव्हा रजा देण्याबाबत अटी घातल्या होत्या ! असे कॉलेजने पहिल्या पासूनच ह्यांचे खूप लाड केले. हे लाड म्हणजे नुसते लाड नव्हते तर त्यात कौतुकही होते. वा.ल.सरांनी सुचवलेला हा प्राध्यापक होता, तेव्हा तो नक्कीच चांगला असेल, हुषार असेल अशी प्राचार्य ना.य.डोळे सरांची खात्री होती. अर्थात त्यांचा हा विश्वास ह्यांनी यथार्थ ठरविला. हुषार, शिस्तप्रिय, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून ह्यांनी नांवलौकिक मिळवला.

विद्यार्थ्यांना ह्यांचे शिकवणे मनापासून आवडे. अभ्यासाबरोबरच वेगवेगवेगळ्या विषयांची हे विद्यार्थ्यांना माहिती करून देत. एम्.ए.चे विद्यार्थी कॉलेज सोडून आता ख-या जगात प्रवेश करणार आहेत हे लक्षात घेऊन त्यांना हे योग्य ते मार्गदर्शन करीत. अभ्यासक्रम संपल्यावर शेवटच्या तासात ‘नोकरीसाठी अर्ज कसा करावा ?’, ‘नोकरीसाठी मुलाखत कशी द्यावी ?” हेही सांगत. आता इतकी वर्षं झाल्यानंतर खूप विद्यार्थी भेटतात तेव्हा या सगळ्यांचा त्यांना नेहमीसाठीच कसा उपयोग झाला ते सांगतात. त्यावेळेस मलाही ह्यांचे कौतुक वाटते. विद्यार्थ्यांना ह्यांची वाक्यं न वाक्यं अजूनही जशीच्या तशी पाठ आहेत. हे जे सांगत होते ते तंतोतंत कसे बरोबर असायचे याचा त्यांना वारंवार प्रत्यय येतो.

ह्यांनी कॉलेज गॅदरिंगमध्ये तीन चोक तेरा, भ्रमाचा भोपळा ही हास्यप्रधान तीन अंकी नाटके बसवली आणि सगळ्यांना रात्रभर पोट धरधरून हसत ठेवले. उदगीरच्या प्रेक्षकांनी ही दोन्ही नाटके डोक्यावर घेतली. युवक महोत्सवासाठी चार वर्षे एकांकिका बसवल्या. त्यातल्या फोन करण्यापूर्वी या एकांकिकेसाठी ह्यांनी डिझाईन देऊन उदगीरलाच स्पॉट लाईट्स बनवून घेतले. यापूर्वी स्पॉटलाईटचा

वापर उदगीरमध्ये कुणीच केला नव्हता. त्यामुळे या एकांकिकेचे खूप कौतुक झाले आणि तिला बक्षिसही मिळाले. 'भ्रमाचा भोपळा' या नाटकाचे व्हिडिओ शुटिंग तर ह्यांनी साली करून ठेवले आहे. नाटकाच्या व्हिडिओ शुटिंगची पद्धत तेव्हा रूढ झालेली नसतानाचा काळ लक्षात घेता याचे महत्त्व लक्षात येते.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या स्थापनेची कल्पना कशी जन्मली, या कल्पनेचा विकास कसा कसा होत गेला याचेही व्हिडीओ शुटिंगही ह्यांनी करून ठेवले आहे. त्यासाठी सगळ्या संस्थापक सभासदांच्या मुलाखती ह्यांनी चित्रबद्ध केल्या आणि 'उष:काल' हा माहितीपट साली तयार झाला.

महाविद्यालयाच्या मराठी विभागासाठी उदगीर परिसरातील लोकसाहित्याला जतन करण्याच्या हेतूने आणखीही काही माहितीपट निर्माण ह्यांनी निर्माण केले आहेत.

यावर्षी ३० जुलै २००९ रोजी हे सेवानिवृत्त होत आहेत. त्यानंतर आम्ही नेहमीसाठी अमेरिकेत राहावयास जाणार आहोत. तिथे राहून ह्यांचा अभ्यास सुरू रहाणारच आहे. ह्यांचा सेवानिवृत्तीचा काळ त्यामुळे सत्कारणी लगणार आहे. अमेरिकेत आवडीचे काम करायला मिळणार याचा मोठा आनंद ह्यांना मिळणार आहे. कुटुंबातील सर्वांबरोबर राहायला मिळणार असल्याने हा आनंद शतपटीने वाढणार आहे.

एकूण मागे वळून पहातांना आमचे सहजीवन कसे आनंदात गेले, लग्नानंतर यांच्या सहवासात माझे आयुष्य कसे कसे घडत गेले याचे चित्र या गौरव ग्रंथामुळे मलाही कळले. माझे आयुष्य मला छान वाटते आहे. माझी देवावर श्रद्धा आहे. पुनर्जन्मावर विश्वास आहे. त्यामुळे जन्मोजन्मी हेच मला पती म्हणून लाभोत अशी मी देवाजवळ नेहमीच प्रार्थना करत असते. हीच मुले, ह्याच सुना, हीच नातवंडेही मला जन्मोजन्मी लाभोत ही ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझा लेख पूर्ण करते.

सौ. उषा प्रभुणे